# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

## नागपूर मेट्रो विविध संस्थेच्या विद्यार्थ्यांसाठी ठरली मार्गदर्शक

## शालेय व महाविद्यालयाच्या एकूण ७०० विद्यार्थ्यांनी केली मेट्रो सफर



नागपूर: महा मेट्रो नागपूरच्या पब्लिक आउटरीच कार्यक्रमाच्या अंतर्गत नागपूर मेट्रोच्या सुविधा आणि सवलती तसेच विविध योजनांसंबंधी माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोचवण्याचा अनुषंगाने मेट्रो संवाद सारखे उपक्रम राबवले जातात. तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना तसेच शालेय विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयाच्या अनुषंगाने अभ्यासात्मक माहिती देखील पुरवली जाते. त्यानंतर हे विद्यार्थी प्रत्यक्ष मेट्रो सफर करून प्रॅक्टिकल माहिती देखील मिळवतात. गेल्या आठवड्यात सूर्योदया

कॉलेज ऑफ इंजिनीरिंग या महाविद्यालयाच्या शंभर विद्यार्थ्यांना नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या मेट्रो ट्रेनचे संचालन, तांत्रिक आणि व्यवस्थापन तसेच सिग्नलिंगबद्दलची सविस्तर माहिती देण्यात आली. याशिवाय त्रिमूर्ती नगर येथील यशोदा हायस्कुलच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेत मेट्रो संवादच्या माध्यमातून विद्यार्थी सवलती आणि इतर इंथंभूत माहिती दिल्यानंतर जवळ जवळ ६५० विद्यार्थ्यांनी मेट्रो सफर करून प्रत्यक्ष सोयी-सुविधांचा लाभ घेतला.

नागपूर मेट्रो हे आता नुसते पिकनिकचे साधन न राहता नियमित प्रवाश्यांसाठी एक लाईफ लाईन बनत आहे. या शिवाय अभियांत्रिकेचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ह्या मेट्रोचे बांधकाम, अद्ययावत तंत्रज्ञान, मशिनरी आणि इतर तांत्रिक गोष्टी ह्या प्रत्यक्ष शैक्षणिक दृष्टीने अभ्यासण्यासाठी अतिशय उपयुक्त ठरत आहे. ह्याच अनुषंगाने रविवारी सूर्योदय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या शंभर विद्यार्थ्यांनी मेट्रो स्थानकाची संपूर्ण पाहणी केली. महा मेट्रोच्या अधिकाऱ्यांकडून त्यांना सविस्तर माहिती देण्यात आली. त्यानंतर त्यांनी प्रॅक्टिकल ज्ञान घेण्यासाठी माझी मेट्रोने एक्का मार्गिकेवर सफर केली.

## मेट्रो बनली आकर्षणाचे केंद्र

नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प फक्त नागपुरातील नाही तर नागपूर बाहेरील विविध शहरातील तसेच इतर राज्यांमधील इलेक्ट्रिकल आणि सिव्हिल इंजिनीअरिंगच्या विद्यार्थ्यांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे, हे विशेष. महा मेट्रोने बांधलेल्या मेट्रो स्थानकांचे डिझाईन, गिनीज बुक रेकॉर्ड, एशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नाव असलेले डबल डेकर संरचना आणि कामठी मार्ग गुरुद्वाराजवळ बांधलेला बहुस्तरीय वाहतूक व्यवस्था पूल पाहण्यासाठी विदर्भ आणि इतर राज्यांतील विद्यार्थी दरदिवशी नागपूरला पोहोचतात आहेत. अलीकडेच छत्तीसगड राज्यातील बिलासपूर येथील आणि रामटेक तसेच चंद्रपूर येथील अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे पथक तांत्रिक माहिती घेण्यासाठी नागपुरात आले होते. महा मेट्रोने अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून केलेल्या बांधकामादरम्यान जागतिक दर्जाचे दर्जेदार काम करून वेळ, पैसा आणि श्रमाची बचत केली आहे. महामेट्रोचा नागपूर प्रकल्प विशेषत: विद्यार्थ्यांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे.

**शिक्षकांसह प्रवास**

यशोदा शाळेच्या तीन शाखांच्या विद्यार्थ्यांनी मेट्रो राईडचा आनंद लुटला. 52 शिक्षक व कर्मचाऱ्यांसह 622 विद्यार्थी वासुदेवनगर मेट्रो स्टेशनवर पोहोचले. स्थानकावर तैनात असलेल्या मेट्रो अधिकाऱ्यांनी स्थानकात प्रवेश करण्यापासून ते गाडी पोहोचेपर्यंत सविस्तर माहिती दिली. मुलांना लिफ्ट, एस्केलेटर, जिना, तिकीट काउंटर, ऑटोमोटिव्ह गेट आणि स्टेशनवर उपलब्ध असलेल्या स्टेशनच्या विविध कामकाजाची माहिती करून देण्यात आली. या मुलांनी वासुदेव नगर ते सीताबर्डी इंटरचेंज आणि तेथून वासुदेव नगर असा मेट्रोने प्रवास केला. ट्रेनमधील मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी रेल्वे मार्गावरील अंबाझरी तलाव, लिटिल वूड जंगल, विवेकानंद स्मारक, कॉलेज, शाळा, क्रॉसरोड, मार्केटची माहिती दिली. मुलांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. या भेटीदरम्यान मुलांनी शहरातील दृश्य दृश्ये चित्रांच्या माध्यमातून मांडल्याचा उल्लेख केला. बहुतेक मुलांनी फक्त मेट्रो सेवा पुढे प्रवासासाठी वापरण्याचा निर्णय घेतला.